| | |
|---|---|
| विषय क्र.०१. दि.२३,नोव्हेंबर, २०२१. | नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन /कुटुंब निवृत्तीवेतन लाभ सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित करणेबाबत, परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक २२/११/२०२१, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परि/प्रशा/१८३३/२०२१. |
| ठराव क्र. १५९०. | "उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन /कुटुंब निवृत्तीवेतन लाभ सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित करणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.२४ जानेवारी २०१९ अन्वये राज्य शासनाच्या सेवेतून दिनांक ०१ जानेवारी २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात / कुटुंब निवृत्तीवेतनात सातव्या वेतन आयोगानुसार सुधारणा करण्यात आलेली आहे व महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१ मार्च २०१९ अन्वये सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासनाच्या सेवेतून दि.०१ जानेवारी २०१६ नंतर सेवानिवृत्त इ ालेल्या निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन लाभ सुधारीत करण्यात आले आहेत.<br>त्याअनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन लाभ सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत करण्यास व तद्अनुषंगिक देय होणारे भत्ते व इतर सर्व शिफारशी राज्य शासनाने वेळोवळी निश्चित केलेल्या विहीत अटी / शर्तीच्या अधिन राहून, दि.०१ जानेवारी २०१६ पासून ७ वा वेतन लागू करण्याबाबत शासन निर्णयांत नमूद आहे. सातव्या वेतन आयोगाच्या फरकाबाबत स्वतंत्रपणे प्रस्तावित करण्यात येईल. सध्या सातवा वेतन आयोग सेवानिवृत्त झालेले निवृत्ती वेतनधारक / कुटुंबनिवृत्ती वेतनधारक यांना लागू करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, कलम ५१(४) व ४५२ (अ) नुसार, मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन /कुटुंब निवृत्तीवेतन लाभ सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित करणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक १५९० अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.२४ जानेवारी २०१९ अन्वये राज्य शासनाच्या सेवेतून दिनांक ०१ जानेवारी २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात / कुटुंब निवृत्तीवेतनात सातव्या वेतन आयोगानुसार सुधारणा करण्यात आलेली आहे व महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.०१ मार्च २०१९ अन्वये सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासनाच्या सेवेतून दि.०१ जानेवारी २०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन लाभ सुधारीत करण्यात आले आहेत.<br>त्याअनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन लाभ सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत करण्यास व तद्अनुषंगिक देय होणारे भत्ते व इतर सर्व शिफारशी राज्य शासनाने वेळोवळी निश्चित केलेल्या विहीत अटी / शर्तीच्या अधिन राहून, दि.०१ जानेवारी २०१६ पासून ७ वा वेतन लागू करण्याबाबत शासन निर्णयांत नमूद आहे. सातव्या वेतन आयोगाच्या फरकाबाबत स्वतंत्रपणे प्रस्तावित करण्यात येईल. सध्या सातवा वेतन आयोग सेवानिवृत्त झालेले निवृत्ती वेतनधारक / कुटुंबनिवृत्ती वेतनधारक यांना लागू करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, कलम ५१(४) व ४५२ (अ) नुसार, मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची मंजुरी देण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| (चित्रा बाविस्कर) | (अभिजीत बांगर) |
| नगरसचिव | आयुक्त तथा प्रशासक |
| नवी मुंबई महानगरपालिका | नवी मुंबई महानगरपालिका |

| | |
|---|---|
| विषय क्र.०२.<br>दि.२३,नोव्हेंबर,<br>२०२१. | परिवहन उपक्रमातील वातानुकुलीत (Volvo AC) बसेसचे निर्लेखन धोरण मान्यतेबाबत, परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक २२/११/२०२१, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परि/अभि/१२२/२०२१. |
| ठराव क्र. १५९१. | "उपरोक्त संदर्भात परिवहन उपक्रमातील वातानुकुलीत (Volvo AC) बसेसचे निर्लेखन धोरण मान्यतेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे सद्याच्या उपलब्ध वातानूकुलित वोल्वो बसेसपैकी १५ वोल्वो डिझेल बसेस उक्त दिनांक १४/११/२०१८ रोजीच्या मंजूर धोरणानुसार बसेसचे आयुर्मान व धाव किलोमीटर हे निर्लेखनाचे निकष पुर्ण करत आहे. सदरच्या प्रस्तावित बसेस निर्लेखन करण्याच्या अनुषंगाने खालील तपशिल सादर आहे.<br>१) इंधन खपत व इंधन दरवाढ:<br>वोल्वो एसी बसेसचे सुरवातीच्या वापराच्या वर्षात एक लिटर इंधन खपत झाल्यास सरासरी १.९० ते २.१० कि.मी. धाव इतके मायलेज मिळत होते. परंतु ११ वर्षानंतर एक लिटर डिझेलमध्ये १.५१ ते १.६८ कि.मी. धाव किमी पर्यंत मायलेज कमी झालेले असल्याने इंधन खर्चात वाढ झालेली आहे.<br>याचबरोबर सद्या इंधन दरात मोठया प्रमाणात वाढ झालेली असून, वर्ष २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये डिझेल मध्ये रू. ३८/- ची वाढ झाली होती.<br>२) देखभाल दुरूस्ती खर्च:<br>या बसेसचे आयुर्मान जास्त झाल्याने देखभाल दुरूस्ती कामांचे प्रमाणे वाढलेले आहेत. तसेच इंधन दरवाढ व इतर महागाई वाढीमुळे या बसेसच्या सुट्टे भागांवरील खर्च व दुरूस्तीवरील खर्चात वाढ झालेली आहे. या बसेससाठी आवश्यक सुटेभाग हे परदेशी बनावटीचे असल्याकारणाने त्याच्या सुटे भागाच्या दरात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.<br>३) वाढता परिचालन खर्च:<br>इंधन दरवाढ, देखभाल दुरूस्ती खर्च दरवाढ व वेतनावरील खर्चात वाढ या सर्व बाबींमुळे वोल्वो एसी बसेसवरील परिचालन खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. वर्ष २०१४-१५ च्या कालावधीत परिचालन खर्च रू. ६८.४२ (Diesel /km + Maintenance), इतका होता व सद्यस्थितीत (२०२०-२०२१)चालक, वाहक, मेकॅनिक व इतर प्रशासकीय खर्चासह प्रचलन खर्च रू. ९२.८७ (Diesel /km + Maintenance) इतका झालेला आहे. यावरून परिचालन खर्चात रू. २२.६५ इतकी वाढ झाली आहे.<br>४) सक्षम व किफायती पर्याय:<br>सध्या परिवहन उपक्रमाकडे वातानूकुलित इलेक्ट्रिक बसेस पुरेशा प्रमाणात उपलब्ध झालेल्या असल्याने प्रस्तावित डिझेल वातानुकुलीत बसेसकरीता उत्तम पर्याय उपलब्ध झालेला आहे. तसेच इलेक्ट्रीक बसेस करीता तुलनेने कमी परिचालन असून पर्यावरणपूकरक आहेत.<br>प्रस्तावित संपूर्ण तपशिल लक्षात घेता डिझेल इंधनावरील वातानूकुलित वोल्वो बसेस विहीत आयुर्मान किंवा धाव किमी पूर्ण झाल्यानंतर निर्लेखन करणे हितावह आहे. या अनुषंगाने "ज्या वातानूकुलित बसेसचे आयुर्मान १२ वर्षे अथवा ७.५ ते ८.० लक्ष धाव कि.मी. जे अगोदर होईल त्याप्रमाणे सदर बसेस निर्लेखन करण्यात यावी" सदर धोरणास मंजूरी मिळण्याकरीता प्रस्तावित करण्यात आलेले आहे. धोरणास मंजूरीनंतर बसेसचे निर्लेखन करण्याकरीता विहीत ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.<br>सबब, प्रस्तावित केल्यानुसार परिवहन उपक्रमाच्या वातानूकुलित वोल्वो बसेसचे आयुर्मान १२ वर्षे अथवा ७.५ ते ८.० लक्ष धाव कि.मी. जे अगोदर पूर्ण होईल त्याप्रमाणे "जशा आहेत तशा स्थितीत" ई-लिलाव पध्दतीने निर्लेखन करणे बाबतच्या धोरण मान्यतेच्या प्रस्तावास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३४५ नुसार, मा. आयुक्त तथा प्रशासक, नवी मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>परिवहन उपक्रमातील वातानुकुलीत (Volvo AC) बसेसचे निर्लेखन धोरण मान्यतेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०२ ठराव क्रमांक १५९१ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रस्तावित केल्याप्रमाणे सद्याच्या उपलब्ध वातानूकुलित वोल्वो बसेसपैकी १५ वोल्वो डिझेल बसेस उक्त दिनांक १४/११/२०१८ रोजीच्या मंजूर धोरणानुसार बसेसचे आयुर्मान व धाव किलोमीटर हे निर्लेखनाचे निकष पुर्ण करत आहे. सदरच्या प्रस्तावित बसेस निर्लेखन करण्याच्या अनुषंगाने खालील तपशिल सादर आहे.<br>१) इंधन खपत व इंधन दरवाढ:<br>वोल्वो एसी बसेसचे सुरवातीच्या वापराच्या वर्षात एक लिटर इंधन खपत झाल्यास सरासरी १.९० ते २.१० कि.मी. धाव इतके मायलेज मिळत होते. परंतु ११ वर्षानंतर एक लिटर डिझेलमध्ये १.५१ ते १.६८ कि.मी. धाव किमी पर्यंत मायलेज कमी झालेले असल्याने इंधन खर्चात वाढ झालेली आहे.<br>याचबरोबर सद्या इंधन दरात मोठया प्रमाणात वाढ झालेली असून, वर्ष २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये डिझेल मध्ये रू. ३८/- ची वाढ झाली होती.<br>२) देखभाल दुरूस्ती खर्च:<br>या बसेसचे आयुर्मान जास्त झाल्याने देखभाल दुरूस्ती कामांचे प्रमाणे वाढलेले आहेत. तसेच इंधन दरवाढ व इतर महागाई वाढीमुळे या बसेसच्या सुट्टे भागांवरील खर्च व दुरूस्तीवरील खर्चात वाढ झालेली आहे. या बसेससाठी आवश्यक सुटेभाग हे परदेशी बनावटीचे असल्याकारणाने त्याच्या सुटे भागाच्या दरात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.<br>३) वाढता परिचालन खर्च:<br>इंधन दरवाढ, देखभाल दुरूस्ती खर्च दरवाढ व वेतनावरील खर्चात वाढ या सर्व बाबींमुळे वोल्वो एसी बसेसवरील परिचालन खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. वर्ष २०१४-१५ च्या कालावधीत परिचालन खर्च रू. ६८.४२ (Diesel /km + Maintenance), इतका होता व सद्यस्थितीत (२०२०-२०२१)चालक, वाहक, मेकॅनिक व इतर प्रशासकीय खर्चासह प्रचलन खर्च रू. ९२.८७ (Diesel /km + Maintenance) इतका झालेला आहे. यावरून परिचालन खर्चात रू. २२.६५ इतकी वाढ झाली आहे.<br>४) सक्षम व किफायती पर्याय:<br>सध्या परिवहन उपक्रमाकडे वातानूकुलित इलेक्ट्रिक बसेस पुरेशा प्रमाणात उपलब्ध झालेल्या असल्याने प्रस्तावित डिझेल वातानुकुलीत बसेसकरीता उत्तम पर्याय उपलब्ध झालेला आहे. तसेच इलेक्ट्रीक बसेस करीता तुलनेने कमी परिचालन असून पर्यावरणपूकरक आहेत.<br>प्रस्तावित संपूर्ण तपशिल लक्षात घेता डिझेल इंधनावरील वातानूकुलित वोल्वो बसेस विहीत आयुर्मान किंवा धाव किमी पूर्ण झाल्यानंतर निर्लेखन करणे हितावह आहे. या अनुषंगाने "ज्या वातानूकुलित बसेसचे आयुर्मान १२ वर्षे अथवा ७.५ ते ८.० लक्ष धाव कि.मी. जे अगोदर होईल त्याप्रमाणे सदर बसेस निर्लेखन करण्यात यावी" सदर धोरणास मंजूरी मिळण्याकरीता प्रस्तावित करण्यात आलेले आहे. धोरणास मंजूरीनंतर बसेसचे निर्लेखन करण्याकरीता विहीत ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.<br>सबब, प्रस्तावित केल्यानुसार परिवहन उपक्रमाच्या वातानूकुलित वोल्वो बसेसचे आयुर्मान १२ वर्षे अथवा ७.५ ते ८.० लक्ष धाव कि.मी. जे अगोदर पूर्ण होईल त्याप्रमाणे "जशा आहेत तशा स्थितीत" ई-लिलाव पध्दतीने निर्लेखन करणे बाबतच्या धोरण मान्यतेच्या प्रस्तावास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३४५ नुसार, मा. आयुक्त तथा प्रशासक, नवी मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी देण्यात येत आहे. |

**सही/-**
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

**सही/-**
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका